## डॉक्टरांचा राज्यव्यापी संप अखेर मागे!; मात्र 9 ऑगस्टपासून आझाद मैदानावर

**ठाणे :** डोंबिवलीतील डॉक्टर मारहाण प्रकरणाच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) ने पुकारलेला राज्यव्यापी संप अखेर मागे घेण्यात आला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणातील मुख्य आरोपीचा जामीन रद्द केल्यानंतर IMA ने हा निर्णय घेतला. त्यामुळे राज्यभरातील रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह आरोग्य व्यवस्थेला मोठा दिलासा मिळाला आहे. संप मागे घेतल्यामुळे आता ओपीडी सेवा, नियमित तपासण्या आणि इतर वैद्यकीय सेवा पूर्ववत सुरू होणार आहेत.


दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता

epaper.hinduprakashwarta.com | Web portal : hinduprakashwarta.com

PRGI No.: MHMAR/25/A2358

सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी


## टीम इंडियासमोर 388 धावांचे आव्हान

**लंडन :** भारत आणि इंग्लंड यांच्यात तिसरा आणि निर्णायक सामना लॉर्ड्सवर सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडने नाणफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली. इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रूकचा हा निर्णय योग्यच ठरला. कारण इंग्लंडच्या फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांची अक्षरशः पिसे काढली. भारताला इंग्लंडची पहिली विकेट घेण्यासाठी १९२ धावांपर्यंत वाट पाहावी लागली. यावरून भारतीय गोलंदाजांची किती घाम निघाला हे दिसून येते. इंग्लंडने ५० षटकात ३ गडी गमावून ३८७ धावा केल्या. तसेच विजयासाठी ३८८ धावांचे आव्हान दिले आहे. आता हे आव्हान गाठण्याचे भारतीय फलंदाजांसमोर आव्हान आहे. या सामन्यात अनुभवी रोहित शर्मा आणि विराट कोहली काय करतात याकडे लक्ष असणार आहे.


छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २० जुलै २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ९० ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com


# जम्मू-काश्मीरमध्ये ढगफुटी, 12 मृत्यूमुखी, 6 बेपत्ता; वैष्णोदेवी व अमरनाथ यात्रा स्थगित

**जम्मू :** जम्मू-काश्मीरमधील पूंछ आणि राजौरी जिल्ह्यांत शनिवारी रात्री झालेल्या ढगफुटीने भीषण रूप धारण केले असून, अचानक आलेल्या पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तहानी झाली आहे. या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला असून सहा जण बेपत्ता आहेत. बचाव पथकांनी शोधमोहीम तीव्र केली असून, मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. गेल्या २४ तासांत पूंछमध्ये ७७ मिमी, तर राजौरीमध्ये १०३ मिमी पावसाची नोंद झाली आहे. पीर पंजाल भागातील अनेक निवासी क्षेत्रे पाण्याखाली गेली असून, राजौरी जिल्ह्यातील बेला कॉलनीमध्ये घरे, गाड्या आणि पायाभूत सुविधा पुराच्या प्रवाहाने वाहून गेल्या आहेत. राजौरी आणि पूंछमधील दुर्गम भागातही जीवितहानी झाली आहे. कोट्यवधी रुपयांचे शेतीचे आणि मालमत्तेचे नुकसान झाले असून, संपूर्ण परिसरात प्रशासनाकडून नुकसानीचा आढावा घेतला जात आहे.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता, उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी संबंधित जिल्ह्यांतील अधिकाऱ्यांशी चर्चा करून बाधित कुटुंबांना तातडीने मदत देण्याचे निर्देश दिले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही उपराज्यपाल आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्याशी संपर्क साधून केंद्र सरकारकडून सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. दरम्यान, दिल्ली येथे नियोजित आंदोलनासाठी गेलेले मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला परिस्थितीवर लक्ष



ठेवून असून, ते तातडीने जम्मूमध्ये परतणार आहेत. "पाऊस आणि पुरामुळे नुकसान झालेल्यांना मदत करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करेल," अशी ग्वाही त्यांनी दिली. तसेच, फारुख अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील नियोजित आंदोलन आपल्या वेळापत्रकानुसार सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**धार्मिक यात्रा स्थगित :**

हवामान खात्याने वर्तवलेल्या अतिवृष्टीच्या इशार्यानंतर, प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून श्री अमरनाथ यात्रेनंतर आता 'श्री माता वैष्णोदेवी' तीर्थयात्राही तात्पुरती स्थगित केली आहे. श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डाने भाविकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत हा निर्णय घेतला आहे. पहलगाम आणि बालटाल मार्गावर दरड कोसळण्याचा धोका असल्याने अमरनाथ यात्राही थांबवण्यात आली आहे. हवामानात सुधारणा होऊन परिस्थिती सुरक्षित झाल्याशिवाय या दोन्ही यात्रा सुरू केल्या जाणार नाहीत, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

**हवामान विभागाचा इशारा :**

भारतीय हवामान विभागाने १९ ते २३ जुलै या पाच दिवसांच्या कालावधीत जम्मू-काश्मीरमध्ये खराब हवामानाचा इशारा दिला आहे. पीर पंजाल पर्वतरांग, अनंतनाग, पहलगाम, कुलगाम, शोपियान, गुलमर्ग आणि सोनमर्ग-झोझिला मार्गासह अनेक ठिकाणी भूस्खलन, चिखलाचे लोट आणि दरडी कोसळण्याची शक्यता आहे. या हवामान स्थितीचा परिणाम जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गासह प्रमुख रस्त्यांच्या दळणवळणावर होऊ शकतो. सध्यातरी महामार्ग वाहतुकीसाठी खुला असला तरी, प्रशासनाने पर्यटकांना आणि नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. नद्या आणि ओढ्यांजवळ जाणे टाळावे, अशा सूचना देण्यात आल्या असून हाय-अलर्ट जारी करण्यात आला आहे. पुढील काही दिवस पावसाचा जोर कायम राहिल्यास नुकसानीची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. प्रशासन, पोलीस आणि बचाव पथके युद्धपातळीवर मदतकार्य राबवत असून, नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्याचे काम सुरू आहे.

## थोडक्यात वार्ता

### संसदेचे पावसाळी अधिवेशन; पंतप्रधान माध्यमांशी साधणार संवाद

**नवी दिल्ली:** संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवार, २० जुलैपासून सुरू होत आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, पंतप्रधान नरेंद्र मोदी सकाळी १०.१५ वाजता संसद भवनातील 'हंस द्वार' येथे माध्यमांशी संवाद साधण्याची शक्यता आहे. हे अधिवेशन २० जुलै ते १३ ऑगस्ट या कालावधीत चालणार आहे. पावसाळी अधिवेशनात केंद्र सरकार अनेक महत्त्वाची विधेयके मांडणार आहे. परकीय अंशदान (नियमन) दुरुस्ती विधेयकाद्वारे परकीय देणगीच्या प्रमाणपत्राचे नूतनीकरण न झाल्यास किंवा मुदत संपल्यास ते रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय, परकीय देणगी आणि मालमत्तेच्या व्यवस्थापनासाठी एक विशेष अधिकार मंडळ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. केरळ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक वादाचा केंद्रबिंदू ठरण्याची शक्यता आहे. विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक, २०२५ हे पूर्वीच्या 'हायर एज्युकेशन कमिशन ऑफ इंडिया' विधेयकाचे सुधारित रूप आहे. हे विधेयक विद्यापीठ अनुदान आयोग, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद आणि राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद यांची जागा घेणार आहे. तसेच, 'इन्स्टिट्यूट ऑफ नॅशनल इम्पॉर्टन्स' संस्थांना पहिल्यांदाच नियामक चौकटीत आणण्याचा प्रयत्न यात आहे.

### प्रत्येक विद्यार्थ्याने मातृभाषेसह आणखी एक भारतीय भाषा शिकावी : अमित शहा

**कोलकाता :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी रविवारी कोलकाता येथील राष्ट्रीय ग्रंथालय परिसरात देशातील पहिले भाषा संग्रहालय 'शब्दलोक' (म्युझियम ऑफ वर्ड्स) याचे उद्घाटन केले. केंद्रीय संस्कृती मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय ग्रंथालयाने विकसित केलेले हे संग्रहालय भारतातील भाषिक आणि सांस्कृतिक वैविध्याचे दर्शन घडवणार आहे. यावेळी बोलताना अमित शहा म्हणाले की, भाषा ही कोणत्याही देशाच्या वारशाची जपणूक करणारी आणि त्या देशाची संस्कृती समजून घेण्याचे प्रभावी माध्यम असते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या मातृभाषेबरोबरच किमान आणखी एक भारतीय भाषा शिकावी, त्यामुळे देशाच्या विविध संस्कृती अधिक चांगल्या प्रकारे समजून घेता येतील, असे त्यांनी सांगितले. ग्रंथालयांचे महत्त्व अधोरेखित करताना त्यांनी सांगितले की, देशाचे भविष्य केवळ महाविद्यालये आणि विद्यापीठांतील विद्यार्थ्यांच्या संख्येवर अवलंबून नसून, किती नागरिक ग्रंथालयांचा उपयोग करतात यावरही ते ठरते. बंगालच्या बौद्धिक परंपरेचा गौरव करताना त्यांनी साहित्य, विज्ञान, क्रांती आणि शिक्षण क्षेत्रात राज्याने दिलेल्या योगदानाचा उल्लेख केला.

### पुढील आठवड्यापासून पावसाचा जोर वाढणार

**नवी दिल्ली :** जुलै महिन्याच्या उत्तरार्धात पावसाने अचानक ओढ दिल्याने निर्माण झालेली चिंतेची स्थिती आता निवळण्याची चिन्हे आहेत. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, पुढील आठवड्यापासून मान्सून पुन्हा एकदा सक्रिय होणार असून, देशाच्या विविध भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे अनेक शहरांत उष्णता आणि दमटपणा वाढला होता. प्रत्यक्ष तापमानापेक्षा 'फिलिंग हॉट' (जास्त उकाडा) जाणवल्याने नागरिक त्रस्त झाले होते. आता मात्र बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पावसासाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

# SIR नंतर मतदार यादीतून नाव हटलं तरी नागरिकत्व रद्द होत नाही!

## सर्वोच्च न्यायालयाचे महत्त्वाचे स्पष्टीकरण

**नवी दिल्ली :** विशेष सघन पुनरिक्षण (SIR) प्रक्रियेनंतर एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीतून वगळले गेले, तरी त्यामुळे त्या व्यक्तीचे भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येत नाही, असे अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. नागरिकत्वाचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नसून तो कायद्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडेच असल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

१३ ते १७ जुलै २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयाने घटनात्मक अधिकार, निवडणूक प्रक्रिया, नागरिकत्व, मालमत्ता, वारसा, खाणकाम आणि करार कायद्याशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय दिले. या निकालांमधून विविध कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत न्यायालयाने स्पष्ट भूमिका मांडली आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, SIR प्रक्रियेनंतर मतदार यादीतून नाव वगळले जाणे आणि नागरिकत्व गमावणे या दोन वेगळ्या बाबी आहेत. एखाद्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत नसल्याने तो भारतीय नागरिक नाही, असा निष्कर्ष काढता येणार नाही. नागरिकत्वाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला नसल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले. याचवेळी SIR प्रक्रियेनंतर नाव वगळलेल्या नागरिकांसाठी उपलब्ध असलेल्या अपील प्रक्रियेबाबत दाखल याचिकेवरही न्यायालयात सुनावणी झाली.

**हायकोर्टाच्या अधिकारांवरही स्पष्ट भूमिका :**

भारतीय राज्यघटनेच्या कलम २२६ अंतर्गत अधिकार वापरताना उच्च न्यायालयांना कनिष्ठ न्यायालयांनी नोंदवलेल्या पुराव्यांचे पुन्हा मूल्यमापन करता येणार नाही किंवा वस्तुस्थितीवरील निष्कर्षांमध्ये हस्तक्षेप करता येणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने म्हटले की, कलम २२६ अंतर्गत हायकोर्टाची भूमिका केवळ कायद्याच्या अंमलबजावणीतील त्रुटी दुरुस्त करण्यापुरती मर्यादित आहे. त्यामुळे हायकोर्ट अपील न्यायालयाप्रमाणे संपूर्ण प्रकरणाची नव्याने सुनावणी घेऊ शकत नाही. या निरीक्षणासह कर्नाटक उच्च न्यायालयाचा संबंधित निर्णय रद्द करण्यात आला.

**नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा अधिकार नाही :**

कर्नाटक विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत नगरपंचायतीतील नामनिर्देशित सदस्यांना मतदानाचा अधिकार नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. अशा सदस्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे राज्यघटनेच्या तरतुदींना विरोधात असल्याचे नमूद करत न्यायालयाने कर्नाटक उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

**वसीयत आणि मालमत्तेबाबत महत्त्वाचे निर्णय:**

सर्वोच्च न्यायालयाने वसीयत (मृत्युपत्र) संदर्भातही महत्त्वाचा निर्णय दिला. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याच्या वसीयतीची अंमलबजावणी करण्यासाठी तीन वर्षांच्या आत न्यायालयात अर्ज करणे बंधनकारक नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. अशा अर्जाची आवश्यकता निर्माण झाल्यानंतरच कालमर्यादा लागू होते. याशिवाय, मूळ विक्रेत्याच्या


-> पान 2 वर


# आषाढी वारीसाठी सरकारची तयारी! पंढरपूरच्या विकासासाठी ६७१ कोटी

**पंढरपूर :** आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकऱ्यांच्या सुरक्षित, आरोग्यदायी आणि सुरळीत दर्शनासाठी राज्य सरकारने व्यापक नियोजन केले असून, पंढरपूरच्या विकासासाठी आतापर्यंत ६७१ कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी देण्यात आली आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. यंदाच्या वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स, अतिरिक्त रुग्णवाहिका, वाढीव एसटी बसेस, एनडीआरएफची तैनाती, सीसीटीव्ही देखरेख, वाहतूक व्यवस्थापन आणि स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर विविध विभागांच्या तयारीचा आढावा घेतल्यानंतर उपमुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासनाला आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. यावेळी बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, "आषाढी वारी ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा आत्मा आहे. लाखो वारकऱ्यांची सेवा हीच सरकारची प्राथमिकता आहे. त्यामुळे नगरपरिषद, जिल्हा प्रशासन, आरोग्य, पोलीस, अग्निशमन, परिवहन, वीज, मंदिर समिती आणि इतर सर्व यंत्रणांनी एकाच टीमप्रमाणे समन्वयाने काम करावे." वारीनंतर प्रत्येक वारकऱ्याच्या तोंडी "यंदाचे नियोजन उत्कृष्ट होते" हेच शब्द असावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**६७१ कोटींच्या विकासकामांना मंजुरी :**

पंढरपूरच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य सरकारने आतापर्यंत ६७१ कोटी रुपयांच्या विविध विकासकामांना मंजुरी दिली आहे. या निधीतून रस्त्यांचे जाळे, पायाभूत सुविधा, दर्शन मंडप, वारकरी सुविधा केंद्रे आणि इतर विकासकामे टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले. तसेच, अतिरिक्त निधीची आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने प्रस्ताव सादर करावा. नगरविकास विभागाकडून आवश्यक निधी त्वरित उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा :**

यंदाच्या वारीत आरोग्य सेवांवर विशेष भर देण्यात आला आहे. अतिरिक्त रुग्णवाहिका, वैद्यकीय पथके, उपचार केंद्रे, वारकऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्था आणि आवश्यकतेनुसार अतिरिक्त एसटी बसेसची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विशेष म्हणजे, प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यासाठी एमएसआरडीसीलाही आवश्यक सूचना देण्यात आल्याची माहिती उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

# सुतगिरणी चौकात गॅस सिलिंडरचा स्फोट


हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी


**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सुतगिरणी चौक परिसरातील जानकी हॉटेलजवळ असलेल्या 'कृष्णा स्वीट्स आणि दूध डेअरी'ला आज, १९ जुलै रोजी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागल्याची धक्कादायक घटना घडली. पहाटे २ च्या सुमारास लागलेल्या या आगीत दुकानाचे मोठे नुकसान झाले असून, गॅस सिलिंडरचा स्फोट झाल्याने परिसरात काही काळ प्रचंड भीतीचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे अचानक लागलेल्या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. आगीची तीव्रता इतकी होती की दुकानातील एक गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. या आवाजाने परिसरातील नागरिक जागे झाले आणि त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. विशेष म्हणजे, दुकानातील आणखी एका सिलिंडरमधून मोठ्या प्रमाणावर गॅस गळती सुरू होती. परंतु, नागरिकांच्या तत्परतेमुळे आणि वेळीच आग आटोक्यात आल्यामुळे पुढील अनर्थ टळला; अन्यथा मोठा अनर्थ ओढवला असता. आगीची माहिती मिळताच माजी उपमहापौर राजेंद्र जंजाळ यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने मदतकार्यात सक्रिय सहभाग नोंदवला. अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले असून वेळेत आग आटोक्यात आणण्यात यश आले. या भीषण अपघातात दुकानाचे व आतील साहित्याचे प्रचंड मोठे नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. पोलिस आणि संबंधित प्रशासन या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# पोलीस पाटलास मारहाण शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी; ॲट्रॉसिटी दाखल

## एस आय आर चे काम करताना घडली घटना; आरोपी विरोधात ताडकळस पोलिसात गुन्हा दाखल


हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी


**परभणी:** ताडकस येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शीर्षी बुद्रुक येथील पोलीस पाटील असलेले नितीन शिवभक्त यांना ग्रामपंचायत कार्यालयासमोर एसआयआरचे प्रशासकीय काम करत असतानाई पीक पाहणी करण्यासाठी का येत नाही या कारणामुळे लाथा बुक्क्यांनी मारहाण करून जातीय वाचक शिवाय करून जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे शुक्रवार दिनांक 17 जुलै रोजी सकाळी आठ वाजता या प्रकरणात ताडकळस पोलीस ठाण्यात पोलीस पाटील यांच्या फिर्यादीवरून शासकीय कामात अडथला निर्माण केल्याचा व ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील पोलीस करत आहे याबाबत अधिक माहिती अशी की ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिरशी बुद्रुक येथील नितीन मुगाची शिव भगत यांनी लेखी तक्रार दिली आहे की परभणी तहसीलदार यांच्या आदेशानुसार यांच्या आदेशानुसार शुक्रवार 17 जुलै रोजी सकाळी आठ वाजता गावातील ग्रामपंचायत कार्यासमोर बीएलओ असलेले बी एम खटींग यांच्यासोबत सध्या सुरू असलेल्या मतदार यादी चे एस आय आर चे शासकीय काम करीत असताना गावातील धनराज रतन ढगे यांनी पोलीस पाटील यांच्याजवळ येऊन ई- पिक पाहणी कधी करणार आहे तसेच मी सांगतो तेच पीक टाकावे लागेल यावेळी पोलीस पाटील शिव भगत यांनी सध्या ई-पिक पोर्टल सुरू झाले नाही तसेच शासकीय नियमानुसार जे शेतात पीक आहे तेच टाकावे लागेल असे म्हणताच पोलीस पाटील शिव भगत यांची धनराज ढगे यांनी गचांडी धरून जोरात चापट मारून व लाथाबुक्याने मारहाण करून जातीय वाचक शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. पोलीस पाटील शिव भगत हे जातीने बौद्ध असल्याने माहीत असून देखील जाणून-बुजून मारहाण केली याप्रकरणी ताडकळस पोलीस ठाण्यात आरोपी विरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण करणे व ॲट्रॉसिटी ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून घटनास्थळी ग्रामीण पोलीस उप अधीक्षक नामदेव रिठे सहायक पोलीस निरीक्षक जगताप यांनी भेट दिली पुढील तपास ताडकळस पोलीस हे करत आहेत.

## "शाल जोडे"




# वैष्णो लॉजिस्टिककडून शेतकरी व कामगारांची फसवणूक; लेखी आश्वासन फक्त कागदावरच

## आश्वासनांची अंमलबजावणी अद्याप शून्य, 30 दिवसांत निर्णयाचे लेखी आश्वासन दिले; एक महिना उलटूनही रोजगार नाही, कंत्राट नाही, मागण्या प्रलंबितच


हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी


**उरण /रायगड :** उरण तालुक्यातील जासई येथील वैष्णो लॉजिस्टिक यार्ड सीएफएस येथे स्थानिक शेतकरी, भूमिपुत्र व कामगारांना रोजगार आणि कंत्राटांमध्ये प्राधान्य देण्याच्या मागणीसाठी करण्यात आलेल्या आंदोलनावेळी तसेच शेतकरी भूमीपुत्राकडून कंपनीला देण्यात आलेले निवेदन लक्षात घेता कंपनी प्रशासनाने पोलिसांसमोर लेखी आश्वासन देत गेटबंद आंदोलन स्थगित करण्यास भाग पाडले होते. मात्र, लेखी आश्वासनानंतरही प्रत्यक्षात कोणतीही मागणी पूर्ण न झाल्याचा गंभीर आरोप आता शेतकरी आणि कामगारांनी केला आहे.या सर्व पार्श्वभूमीवर उरण मधील



सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी या समस्येवर आवाज उठविला असून तीव्र आंदोलन छेडण्याचा त्यांनी इशारा दिला आहे.

११ जून २०२६ रोजी कंपनीचे जनरल मॅनेजर मनोज नायर यांनी शेतकरी प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते आणि पोलिस प्रशासन यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत एक महिन्याच्या आत दोन स्थानिकांना रोजगार, दोन नवीन कंत्राटे देणे तसेच कंपनीच्या संचालकांसोबत निश्चित कालावधीत बैठक घेऊन उर्वरित मागण्यांवर निर्णय घेण्याचे लेखी आश्वासन देण्यात आले होते. या आश्वासनावर विश्वास ठेवून स्थानिक भूमिपुत्र, शेतकऱ्यांतर्फे आंदोलन तात्पुरते स्थगित करण्यात आले होते .आता मात्र कंपनी प्रशासन कडुन आश्वासन पाळले जात नसल्याने तसेच दिलेली मुदत सुद्धा संपून गेल्याने सदर भूमिपुत्र, शेतकऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे .लेखी आश्वासन पाहता वास्तव वेगळेच असल्याचा आरोप करण्यात येत आहे. संबंधित लेखी आश्वासनाची मुदत संपूनही आजपर्यंत शेतकरी, भूमिपुत्र आणि कामगारांच्या कोणत्याही प्रमुख मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत. रोजगाराचे आश्वासन हवेतच राहिले, कंत्राटांचा प्रश्न प्रलंबितच असून संचालक स्तरावरील निर्णयही झालेला नाही, असा आरोप



आंदोलनकर्त्यांनी केला आहे.

स्थानिकांचे म्हणणे आहे की, कंपनीकडून आंदोलन शांत करण्यासाठी लेखी आश्वासने दिली जातात; मात्र त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली जात नाही. यामुळे कंपनीच्या भूमिकेबाबत शंका निर्माण झाली असून शेतकरी व कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या भूमिपुत्रांना रोजगार आणि कंत्राटामध्ये प्राधान्य देणे ही केवळ नैतिक नव्हे तर संबंधित करारांनुसार पूर्ण करावयाची जबाबदारी असल्याचेही आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. जर लेखी करार आणि आश्वासनांचे पालनच होत नसेल, तर त्याबाबत संबंधित यंत्रणांनी चौकशी करून आवश्यक कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, शेतकरी व कामगारांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, कंपनीने तात्काळ दिलेल्या लेखी आश्वासनांची अंमलबजावणी केली नाही, तर पुन्हा गेटबंद आंदोलन करण्यात येईल. तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन आणि आवश्यक त्या कायदेशीर लढ्याचा मार्ग स्वीकारला जाईल. भविष्यात जे काही दुष्परिणाम होतील त्यासाठी कंपनी प्रशासन जबाबदार राहिल. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास कंपनी प्रशासन जबाबदार राहिल असा कडक इशारा सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी प्रशासनाला दिला आहे.

# संपादकीय

## क्रीडा संस्कृतीचे महासिंहासन आणि फिफा विश्वचषकाचा महासंग्राम

फुटबॉल हा केवळ एक खेळ नसून जगभरातील अब्जावधी चाहत्यांच्या भावनांचा, ऊर्जेचा आणि संस्कृतीचा आविष्कार आहे. फिफा विश्वचषक २०२६ च्या अंतिम सामन्याच्या निमित्ताने फुटबॉल विश्वातील दोन सर्वात बलाढ्य आणि दिग्गज संघ, म्हणजेच गतविजेता अर्जेंटिना आणि युरोपियन चॅम्पियन स्पेन, एकमेकांसमोर उभे ठाकणार आहेत. अमेरिकेतील जगप्रसिद्ध 'मेटलाईफ स्टेडियम'वर होणारा हा ऐतिहासिक महासंग्राम केवळ एका ट्रॉफीसाठी नसून फुटबॉलच्या इतिहासात आपले नाव सुवर्णअक्षरांनी कोरण्यासाठी आहे. या अंतिम सामन्याने जगभरातील क्रीडाप्रेमींची उत्सुकता शिगेला पोहोचवली असून, हा सामना खेळाच्या इतिहासातील एक मैलाचा दगड ठरणार यात शंका नाही. अर्जेंटिनाचा कर्णधार लिओनेल मेस्सी याच्यासमोर या सामन्याच्या निमित्ताने इतिहास घडवण्याचे एक मोठे आणि अभूतपूर्व आव्हान आहे. सलग दुसऱ्यांदा विश्वचषक उंचावून १९६२ मधील ब्राझीलच्या ऐतिहासिक कामगिरीची पुनरावृत्ती करण्याचा अर्जेंटिनाचा इरादा आहे. गेल्या अनेक दशकांत कोणत्याही संघाला सलग दोनदा विश्वविजेतेपद मिळवता आलेले नाही, त्यामुळे मेस्सी आणि त्याच्या सहकाऱ्यांसाठी ही लढत त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोच्च परीक्षा असेल. दुसरीकडे, २०१० मध्ये विश्वविजेतेपदावर नाव कोरणारा स्पेनचा संघ आपल्या आक्रमक आणि वेगवान खेळाच्या जोरावर यंदाच्या स्पर्धेत अजिंक्य वाटत आहे. युवा स्टार लामिन यामालच्या उत्कृष्ट नेतृत्वाखालील स्पॅनिश संघ अर्जेंटिनाच्या अनुभवी फळीला तगडी टक्कर देण्यासाठी सज्ज झाला आहे, ज्यामुळे हा सामना युवा जोश विरुद्ध प्रदीर्घ अनुभव असा रंगणार आहे. या महासंग्रामाचे स्वरूप केवळ मैदानातील खेळापुरते मर्यादित नसून, त्याला एका भव्य जागतिक उत्सवाचे रूप देण्यात आले आहे. विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आलेला भव्य 'हाफटाईम शो' आणि उद्घाटन सोहळ्यातील जागतिक सेलिब्रिटींची उपस्थिती या क्रीडा सोहळ्याची भव्यता द्विगुणित करणारी आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष स्वतः या सामन्याला उपस्थित राहून विजेत्यांना सन्मानित करणार आहेत, जे या स्पर्धेचे जागतिक महत्त्व अधोरेखित करते. महाराष्ट्रातील क्रीडा चाहत्यांसाठी हॉटेल्स पहाटेपर्यंत खुली ठेवण्याचा घेतलेला निर्णय हा क्रीडा संस्कृतीला आणि चाहत्यांच्या उत्साहाला दिलेला प्रशासकीय पाठिंबा दर्शवतो. सरतेशेवटी, हा अंतिम सामना केवळ एका विजेत्याची निवड करणार नाही, तर फुटबॉल या खेळाची जागतिक ताकद आणि त्याचे मानवी संस्कृतीतील अढळ स्थान पुन्हा एकदा सिद्ध करेल.

## SIR नंतर मतदार यादीतून नाव हटलं तरी नागरिकत्व रद्द होत नाही!

पान 1 वरून ->

संमतीशिवाय रेक्टिफिकेशन डीड करून मालमत्तेची ओळख बदलता येणार नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. अशा दुरुस्तीपत्राचा वापर केवळ लेखन किंवा तांत्रिक चुका दुरुस्त करण्यापुरताच करता येईल.

**नोंदणीकृत विक्रीपत्रांबाबत मोठा दिलासा :**

भारतीय पुरावा कायद्यातील कलम ६८ नोंदणीकृत विक्रीपत्रांवर लागू होत नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. विक्रीपत्रासाठी स्वतंत्र साक्षीदारांकडून प्रमाणीकरण करणे कायद्याने अनिवार्य नसल्याने अशा व्यवहारांमध्ये या कलमाचा वापर करता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले.

**वारसा हक्क आणि शेतीजमिनीबाबत निर्णय :**

हिंदू उत्तराधिकार अधिनियमातील कलम २२ नुसार, एखाद्या सहवारसाने मालमत्तेतील हिस्सा विकण्याचा निर्णय घेतल्यास प्रथम श्रेणीतील (Class-I) इतर वारसांना तो हिस्सा आधी खरेदी करण्याचा अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. हा अधिकार शेतीच्या जमिनींनाही लागू होतो, असे सांगत न्यायालयाने पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

**खाण भाडेपट्ट्यात सरकारला रॉयल्टी बदलण्याचा अधिकार :**

खाण भाडेपट्टा करारामध्ये रॉयल्टीचे दर बदलण्याची तरतूद नसली, तरी MMDR कायद्यानुसार सरकारला वेळोवेळी रॉयल्टीचे दर बदलण्याचा अधिकार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे संपूर्ण भाडेपट्टा कालावधीत एकाच दराने रॉयल्टी आकारावी, असा दावा खाण भाडेपट्टाधारक करू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या या महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे निवडणूक प्रक्रिया, नागरिकत्व, मालमत्ता, वारसा आणि प्रशासकीय अधिकारांच्या व्याप्तीबाबत अनेक कायदेशीर मुद्दे अधिक स्पष्ट झाले आहेत.

# विठू माझा लेकुरवाळा; संगे गोपाळांचा मेळा!

पांडुरंग हे विष्णुचा अवतार आहे. त्यामुळे ते संपूर्ण सृष्टीचे पालनहार आहेत. परंतु महाराष्ट्रातील मराठी माणसासाठी विष्णू हे पांडुरंगाच्या(विठ्ठलाच्या)रूपात खरं तर महाराष्ट्राचे कुल दैवत आहे. आषाढ महिना हा विठ्ठलाच्या गजरात तल्लीन असतो.जनुकाय साक्षात विठ्ठल प्रगट झाल्याचे आपल्याला संपूर्ण महाराष्ट्रात दिसुन येते. महाराष्ट्रातील संतांच्या हुदयात स्थान असणारे अवघ्या महाराष्ट्राचे दैवत म्हणजे पंढरपूरचा विठूराया.मराठी वर्षांच्या आषाढ महिन्याच्या शुद्ध पक्षात जी एकादशी येते तिला आषाढी किंवा देवशयनी एकादशी असेही म्हणतात. याच एकादशीला महाएकादशी असेही म्हणतात. त्यामुळे या एकादशीला घरातील प्रत्येक लहान-मोठे व्यक्ती उपवास करून विठुरायाच्या चरणी पुजा-अर्चना करून नतमस्तक होऊन आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी आराधना करतात.वर्षातील एकूण २४ एकादशी पैकी आषाढी एकादशीला आगळेवेगळे महत्व आहे.कारण याच एकादशीला महाराष्ट्रातील लाखो भाविक,वारकरी वारी घेऊन पंढरपूरला जातात व प्रत्येकांना वाटते की जीवनात एकदा तरी वारी अनुभवावी म्हणजे आपण समजू शकतो की वारीचे दर्शन म्हणजे साक्षात पांडुरंगाचे दर्शन. महाराष्ट्राला संतांची भूमी संबोधले जाते. कारण महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ, संत जनाबाई, संत मुक्ताबाई यांच्या सारख्या महान संतांनी संत परंपरेचा वारसा जोपासला आहे. कोणी लहान नाही,कोणी मोठा नाही, सगळे समान व सारखे अशी समतेची भावना सर्व संतांनी लोकांच्या मनात रूजवीली आहे.त्यामुळेच आज संपूर्ण भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून संबोधले जाते.आजही संपूर्ण महाराष्ट्रात संतांचा वारसा दिसून येतो. ही महाराष्ट्रासाठी स्वाभिमानाची गोष्ट आहे. असेही म्हणतात की आषाढी एकादशी पासून चातुर्मासाची सुरूवात होते व आषाढी एकादशीला भगवान विष्णू शेष नागावर निद्रास्थ होतात आणि चातुर्मासानंतर कार्तिकेय एकादशीला जागे होतात.आषाढी एकादशीला आळंदीवरून ज्ञानेश्वराची, देहू वरून तुकारामाची, त्र्यंबकेश्वर येथुन संत निवृत्तीनाथांची, उत्तर भारतातून संत कबीर यांची,तर पैठणवरून एकनाथ महाराजांची पालखी पंढरपूरला विठोबाच्या दर्शनासाठी येतात. या पालख्यांबरोबर सर्व भाविक पायी विठू नामाचा गजर करत पंढरपूरला पोहचतात.एकादशीच्या दिवशी भाविक पहाटे उठून चंद्रभागेच्या तीरी स्नान करतात व तुळस वाहून विठ्ठलाची पुजा-अर्चना करतात.विठ्ठल म्हणजे साक्षात विष्णूचाच अवतार आहे. विठ्ठलाच्या चरणी मस्तक ठेवुन संपूर्ण भाविक मानवजातीच्या कल्याणासाठी आणि येणारे विघ्न दूर व्हावे यासाठी साकडे घालतात व राज्य सुजलाम सुफलाम होण्याची मनोकामना करतात. पौराणिक कथांमध्ये सुध्दा आषाढी एकादशीचा उल्लेख दिसून येतो.मृदुमान्य नावाच्या एका राक्षसाने भगवान शंकराची उपासना करून



त्यांना प्रसन्न केले व मला मरण येणार नाही असा वर शंकरजी जवळुन मागुन घेतला.अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने संपूर्ण देवतांवर विजय मिळविण्याचा निश्चय केला. अशा परिस्थितीत मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू आणि महेश यांचा शोध घेणे सुरू केले. अशावेळी ब्रम्हा, विष्णू, महेश एका गुहेत तीन दिवस लपून बसले. या तिघांच्या एकवटलेल्या श्वासापासुन "एकादशी देवता" उत्पन्न झाली व तिने मृदुमान्य राक्षसाचा वध केला.हीच ती आषाढी एकादशी होय.या दिवसांपासून चातुर्मास सुरू होतो. असा उल्लेख आपल्याला पुराणांमध्ये पहायला मिळते. विदर्भाचे पंढरपूर म्हणून धापेवाड्याची २८५ वर्षांची ओळख आहे.आजही आपल्याला आषाढी एकादशी पासून तर गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी पर्यंत (आखाडीच्या दुसऱ्या दिवसांपर्यंत) धापेवाड्याला भव्य यात्रा दिसून येते. धापेवाड्याचे पांडुरंगाचे परमभक्त श्रीसंत कोलबाजी महाराज दरवर्षी पंढरपूरची वारी करून पांडुरंगाचे दर्शन घ्यायचे. त्यानंतर वृद्धापकाळाने कोलबाजी महाराज पंढरीची वारी करून शकले नाही याची खंत त्यांना वाटु लागली.ते विठ्ठलाचे परमभक्त असल्याने पांडुरंगाला आपल्या परमभक्ताची चिंता वाटायला लागली.अशा परिस्थितीत पांडुरंग श्रीसंत कोलबाजी महाराज यांच्या स्वप्नात येऊन पांडुरंगाने सांगितले की हे माझ्या परम भक्ता तु माझ्या पर्यंत येवू शकत नाही हे मला समजते.त्यामुळे मी स्वतः तुझ्या भेटीसाठी धापेवाड्याला येत आहे.असे पांडुरंगाचे बोलने ऐकुण श्रीसंत कोलबाजी महाराजांनी स्वतःला धन्य मानले व पांडुरंग धापेवाडास्थीत चंद्रभागेच्या काठाच्या विहीरीत स्वयंभू विठ्ठलमूर्तीच्या रूपात गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे आषाढी पौर्णिमेच्या प्रतिपदेला प्रकट झाले. अशी आख्यायिका आहे. दरवर्षी आषाढ महिन्यात एकादशीच्या पाचव्या दिवशी म्हणजे गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी धापेवाड्याला साक्षात पांडुरंग येतात. त्यामुळे धापेवाड्याला पांडुरंगाच्या दर्शनासाठी गुरूपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी भक्तांची भव्य यात्रा आपल्याला पहायला मिळते.देवतांवर विजय मिळविण्यासाठी मृदुमान्य राक्षसाने ब्रम्हा,विष्णू, महेश यांचा शोध घ्यायला सुरुवात केली.अशा परिस्थितीत हे तिन्ही देवता एका गुहेत तीन दिवस लपून बसले.यांच्या श्वासातून एकादशी देवता निर्माण झाली व मृदुममान्य राक्षसाचा वध केला.असे पुराणात आहे.हीच गोष्ट आज आपल्याला लागू होते.आज पृथ्वीवरील संपूर्ण जीवजंतूसाठी श्वास (ऑक्सिजन) ची जोपासना करणे गरजेचे आहे यासाठी वृक्ष लागवड अत्यंत आवश्यक आहे. आज महाराष्ट्र अनेक दऱ्या, डोंगर व बंजार जमीन आहे.या संपूर्ण ठिकाणी मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. आपण पहाल की करोना काळात संपूर्ण जग ऑक्सिजनसाठी धडपडत होते.म्हणजे ऑक्सिजनला किती महत्त्व आहे ते आपल्याला करोनाने चांगल्याप्रकारे शिकविले. याकरीता पृथ्वीला व पृथ्वीवरील जीवसृष्टीला वाचविण्यासाठी सावधगिरीचे उपाय म्हणून घर तीथेच झाड,बंजार जमीन, गडकिल्ले या संपूर्ण ठिकाणी आषाढी एकादशीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी.यासाठी मुख्यत्वेकरून सरकारने, सर्वसामान्यांनी,सरकारी अधिकाऱ्यांनी, राजकीय पुढाऱ्यांनी, सामाजिक संघटनांनी पुढाकार घेऊन वृक्षलागवडीला महत्त्व दिले पाहिजे.यामुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.कारण आज जंगल संपदा वाचविने काळाची गरज आहे. कारण प्रत्येक झाडात,पानांत, फुलात व फळात आपल्याला खऱ्याअर्थाने विठ्ठलाचे दर्शन घडल्याचे दिसून येईल. त्यामुळे आता सर्वांनीच वृक्ष लागवड करून काय डोंगर, काय झाडी, काय हिरवळ गालीचा सम्द ओके करून प्रदूषणावर मात करायला हवी.जय हरी विठ्ठल! पांडुरंग हरी!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# जनतेच्या मनातील 'दादा' : स्व. अजितदादा पवार यांचे कार्य, विचार आणि लोकसेवेचा अमर वारसा

"माणूस आयुष्याने मोठा नसतो, तर समाजासाठी केलेल्या कार्याने मोठा ठरतो."ही उक्ती ज्यांच्या जीवनाला सार्थ ठरते, अशा स्व. अजितदादा पवार यांची जयंती आता महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत 'राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या जयंती कार्यक्रमांमध्ये' समाविष्ट झाली आहे. हा केवळ शासकीय निर्णय नाही, तर जनतेच्या मनात स्थान मिळवलेल्या एका लोकनेत्याच्या कार्याला वाहिलेली कृतज्ञ आदरांजली आहे.

२२ जुलै हा दिवस आता केवळ जन्मदिन म्हणून नव्हे, तर लोकसेवा, विकासदृष्टी, कार्यतत्परता आणि समाजहिताच्या विचारांचा स्मरणदिन म्हणून साजरा केला जाणार आहे. मंत्रालयापासून ते गावपातळीवरील शासकीय कार्यालयांपर्यंत त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला जाईल. मात्र कोणत्याही महान व्यक्तीला खरी आदरांजली फुलांनी नव्हे, तर त्यांच्या विचारांचे आचरण करूनच वाहिली जाते.

स्व. अजितदादा पवार यांचे व्यक्तिमत्त्व हे कार्यक्षम प्रशासन, निर्णयक्षमता आणि जनसामान्यांशी असलेली नाळ यांचे प्रभावी मिश्रण होते. त्यांनी सत्तेला प्रतिष्ठेचे साधन न मानता ती जनतेच्या विकासासाठी वापरण्याचे माध्यम मानले. विकासकामे वेळेत पूर्ण व्हावीत, शासकीय यंत्रणा उत्तरदायी राहावी आणि नागरिकांना शासनाचा लाभ प्रत्यक्ष मिळावा यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.

कोणत्याही समाजाची खरी ताकद ही केवळ आर्थिक विकासात नसते, तर शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सामाजिक न्याय यांसारख्या मूलभूत क्षेत्रांच्या बळकटीकरणात असते. या क्षेत्रांमध्ये सातत्याने लक्ष देण्याचा त्यांचा दृष्टिकोन समाजाभिमुख नेतृत्वाची साक्ष देणारा होता. विकासाचा लाभ शहरापुरता मर्यादित न राहता ग्रामीण भागापर्यंत पोहोचला पाहिजे, ही त्यांची भूमिका अनेकांना प्रेरणा देणारी ठरली.

आजच्या काळात समाजाला सर्वाधिक गरज आहे ती संवेदनशील नेतृत्वाची. तंत्रज्ञान वाढले, साधने वाढली, पण माणुसकी टिकवून ठेवणारे विचार अधिक महत्त्वाचे झाले आहेत. स्व. अजितदादांच्या कार्यातून आपल्याला हेच शिकायला मिळते की लोकप्रतिनिधी हा जनतेचा सेवक असतो. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होणे, त्यांच्या प्रश्नांना स्वतःचे प्रश्न मानणे आणि उपाययोजना करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे हीच खरी लोकसेवा आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी शिक्षणातून सामाजिक परिवर्तनाचा मार्ग दाखवला. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची वाट खुली केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून समानतेचा पाया घातला. या महान विचारधारेचा केंद्रबिंदू एकच होता समाजहित सर्वोच्च. कोणत्याही लोकनेत्याचे मूल्यमापनही याच निकषावर व्हायला हवे. समाजाच्या सर्व घटकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे, हीच खरी लोकशाहीची ताकद आहे.

आज युवकांसमोर अनेक संधी आहेत; पण त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहेत. बेरोजगारी, व्यसनाधीनता, सामाजिक तणाव आणि डिजिटल माध्यमांमुळे वाढणारे मानसिक दडपण या पार्श्वभूमीवर समाजासाठी काम करणाऱ्या नेतृत्वाकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. स्व. अजितदादांचे जीवन हे कठोर परिश्रम, वेळेचे नियोजन, शिस्त आणि कार्यनिष्ठा यांचे उदाहरण म्हणून तरुणांसाठी मार्गदर्शक ठरू शकते.

जयंती म्हणजे केवळ औपचारिक कार्यक्रम नव्हे. ती आत्मपरीक्षणाची संधी असते. आपण समाजासाठी काय करतो? आपल्या परिसरातील एखाद्या गरजू व्यक्तीच्या मदतीला धावून जातो का? शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलासाठी काही करतो का? पर्यावरण, स्वच्छता, रक्तदान, वृक्षारोपण किंवा वृद्धांच्या सेवेसाठी वेळ देतो का? अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रेरणा प्रत्येक जयंतीने दिली पाहिजे.

आज महाराष्ट्राला विकासाबरोबरच सामाजिक ऐक्याचीही गरज आहे. जात, धर्म, भाषा किंवा राजकीय मतभेद यांपलीकडे जाऊन मानवतेचा विचार स्वीकारला, तरच राज्य अधिक सक्षम होईल. समाजाला जोडणारे विचारच चिरंतन असतात. द्वेष नव्हे, तर संवाद; संघर्ष नव्हे, तर सहकार्य; स्वार्थ नव्हे, तर समाजकारण हीच खरी प्रगतीची दिशा आहे.

स्व. अजितदादा पवार यांची जयंती साजरी करताना आपण त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊया. सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा, प्रशासनात कार्यक्षमता, समाजाशी जिव्हाळा आणि विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची वृत्ती आपण आपल्या आयुष्यात रुजवूया. कोणत्याही महान व्यक्तीचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या विचारांचा प्रकाश आपल्या कृतीतून दिसतो.चला, २२ जुलै हा दिवस केवळ पुष्पहार अर्पण करण्यापुरता मर्यादित न ठेवता, समाजसेवा, शिक्षण, पर्यावरण संवर्धन, गरजूंना मदत आणि संविधानिक मूल्यांचे पालन करण्याचा संकल्प करण्याचा दिवस बनवूया. स्व. अजितदादा पवार यांना विनम्र अभिवादन!

त्यांच्या कार्याचा प्रेरणादायी वारसा समाजहितासाठी सदैव मार्गदर्शक ठरो, हीच भावपूर्ण आदरांजली.लेखक हे महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त आहेत.

**लेखक**
**समाजभूषण रामदास**
**वच्छालामाई रखमाजी वाघमारे**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.8888125610**

# दिल्ली पेटली, विद्यार्थी रस्त्यावर; सरकार अजूनही शांत?

## विद्यार्थ्यांचा आक्रोश, दिल्लीतील आंदोलन आणि शासनाच्या उत्तरदायित्वाची खरी वेळ

देशाच्या भवितव्याचा पाया जर शिक्षण असेल, तर त्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हा राष्ट्राच्या प्रगतीचा आत्मा असतो. पण जेव्हा स्पर्धा परीक्षांचे प्रश्नपत्रिकाच पैशाच्या जोरावर बाजारात विकले जातात, तेव्हा केवळ एखादी परीक्षा भ्रष्ट होत नाही, तर लाखो विद्यार्थ्यांची स्वप्ने, पालकांचा विश्वास आणि देशाच्या भविष्यावरील आशाही हादरते. नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरात निर्माण झालेला संताप हा केवळ एका परीक्षेपुरता मर्यादित राहिलेला नाही. तर तो आज संपूर्ण शिक्षण व्यवस्थेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारा राष्ट्रीय विषय बनला आहे. हजारो विद्यार्थी दिल्लीतील जंतर-मंतरवर उतरले आहेत. त्यांच्या मागण्या राजकीय नसून, उत्तरदायित्व, न्याय आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत, एवढ्याच आहेत.

या आंदोलनाला नवे स्वरूप मिळाले ते प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, संशोधक आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या सहभागामुळे. २८ जून पासून त्यांनी उपोषण सुरू केले. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत गेल्यानंतर न्यायालयाच्या निर्देशांनुसार त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र आंदोलन थांबले नाही. उलट त्याची नैतिक ताकद अधिक वाढली. त्यानंतर सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी उपोषणाची धुरा स्वीकारली असून, २० जुलै रोजी संसदेकडे “चलो संसद” मोर्चाची घोषणा कायम असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले आहे. लोकशाहीत आंदोलन हा संविधानाने दिलेला अधिकार आहे. शासनाला विरोध करणे म्हणजे राष्ट्रविरोध नव्हे. उलट शासनाचे लक्ष जनतेच्या प्रश्नांकडे वेधण्याचा तो लोकशाही मार्ग आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन दडपण्यापेक्षा त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणे ही लोकशाहीची खरी कसोटी असते.




आज देशातील लाखो विद्यार्थी एका प्रश्नाचे उत्तर शोधत आहेत. जर मेहनत, प्रामाणिकपणा आणि गुणवत्ता यांना प्रश्नपत्रिका माफियांसमोर पराभूत व्हावे लागणार असेल, तर अभ्यास करण्याचा अर्थ काय? हा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. कारण एका विद्यार्थ्याचे वर्ष वाया जाणे म्हणजे केवळ त्याचे वैयक्तिक नुकसान नसते, तर त्या कुटुंबाच्या आर्थिक, मानसिक आणि सामाजिक आयुष्यावर त्याचे दूरगामी परिणाम होतात. या आंदोलनाला विविध विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला आहे. राहुल गांधी, उद्धव ठाकरे, चंद्रशेखर आझाद यांच्यासह अनेक नेत्यांनी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने संवाद साधावा, अशी भूमिका घेतली आहे. मात्र कोणत्याही आंदोलनाला राजकीय पाठिंबा मिळाला म्हणून त्या आंदोलनातील मूळ प्रश्न गौण होत नाही. उलट शासनाने त्या प्रश्नाचा अधिक गांभीर्याने विचार करण्याची गरज निर्माण होते.

सोनम वांगचुक यांची प्रकृती खालावत असतानाही त्यांनी आंदोलन मागे घेतले नाही. रुग्णालयातूनही त्यांनी २० जुलैच्या संसद मोर्चासाठी नागरिकांना शांततापूर्ण सहभागाचे आवाहन केले आहे. त्यांचे हे आवाहन अनेकांसाठी नैतिक प्रेरणेचे प्रतीक ठरले आहे. तथापि, या संपूर्ण प्रकरणात एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवावी लागेल. कोणत्याही तपासाआधी दोषारोप करणे योग्य नाही. दोषींवर कठोर कारवाई व्हावी, ही विद्यार्थ्यांची अपेक्षा रास्त आहे. पण ती कारवाई कायद्याच्या चौकटीत, निष्पक्ष तपासानंतरच व्हावी, ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. सरकारवर उत्तरदायित्व आहे, तसेच तपास यंत्रणांवर निष्पक्षतेची जबाबदारीही तितकीच आहे.

आज विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास हा सर्वात मोठा धोका आहे. स्पर्धा परीक्षा म्हणजे गुणवत्तेची स्पर्धा राहिली नाही, तर पैशांची स्पर्धा झाली, अशी भावना समाजात निर्माण झाली तर देशाची गुणवत्ता आधारित व्यवस्था कोलमडू शकते. उद्याचे डॉक्टर, अभियंते, वैज्ञानिक, प्रशासकीय अधिकारी आणि न्यायाधीश हेच विद्यार्थी आहेत. त्यांचा आत्मविश्वास ढासळणे म्हणजे देशाच्या भविष्याची पायाभरणी कमकुवत होणे होय. सरकारने या आंदोलनाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नाप्रमाणे न पाहता, राष्ट्रीय शिक्षणव्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करण्याची संधी म्हणून पाहिले पाहिजे. दोषींना कठोर शिक्षा, परीक्षा प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पेपरफुटी रोखण्यासाठी स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणा, तसेच विद्यार्थ्यांशी थेट संवाद, ही चार पावले तातडीने उचलली गेली तर परिस्थिती बदलू शकते.

लोकशाहीत सरकारची ताकद विरोध दडपण्यात नसते, तर विरोध ऐकून त्यावर उत्तर देण्यात असते. संसद हे जनतेच्या प्रश्नांचे मंदिर मानले जाते. त्यामुळे २० जुलैचा प्रस्तावित संसद मोर्चा केवळ आंदोलन नसून, शासन आणि विद्यार्थ्यांमधील विश्वासाची परीक्षा ठरणार आहे. आज देशातील प्रत्येक पालक, प्रत्येक विद्यार्थी आणि प्रत्येक जागरूक नागरिक एका उत्तराची वाट पाहत आहे. या देशात प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित आहे का? या प्रश्नाचे उत्तर घोषणांमध्ये नाही, तर कृतीत दडलेले आहे. कारण प्रश्नपत्रिका फुटली की फक्त एक परीक्षा रद्द होत नाही, तर न्याय, समान संधी आणि संविधानातील समानतेच्या तत्त्वावरही प्रश्नचिन्ह उभे राहते.

देशाला आंदोलन नको आहे, देशाला विश्वास हवा आहे. विद्यार्थ्यांना संघर्ष नको आहे, त्यांना न्याय हवा आहे आणि शासनानेही हे लक्षात ठेवले पाहिजे की, राष्ट्राची खरी उभारणी संसदेच्या भिंतींवर नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या मनातील विश्वासावर उभी असते.

**- प्रवीण बागडे नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



# ट्युशनला गेलेल्या 14 वर्षीय मुलीवर अत्याचार; आरोपीवर गुन्हा दाखल

## पूर्णा तालुक्यातील बरबडी येथील घटना

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** ग्रामीण भागातील मुलींना व मुलांना शिक्षणासाठी व खाजगी शिकवणीसाठी दररोजच ये जा करावी लागते त्यामध्येच ग्रामीण भागातील सुंदर मुलीवर शहरातील टवाळखोर मुलांची करडी नजर असते ग्रामीण भागातील मुलींना आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत असतात असाच एक प्रकार गेलेल्या 14 वर्षे दहा महिने वय असलेल्या अल्पवयीन मुलीला रस्त्याच्या लगतच्या शेतात नेऊन अत्याचार करण्यात आला 14 जुलै रोजी सायंकाळी साडेपाच च्या सुमारास पूर्णा तालुक्यातील बरबडी येथे घडली. पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीवरून आरोपीवर 18 जुलै रोजी पूर्णा पोलीस ठाण्यात पोस्को कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे पीडित मुलीने दिलेल्या तक्रारीत नमूद केलेले आहे की 14 जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास शिकवणीस गेल्यावर आरोपीने त्या ठिकाणी जाऊन मला तुझ्याशी काही बोलायचे आहे असे म्हणत तिच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला कॅनल रोड लगत असलेल्या उसाच्या शेतात पीडित मुलीला ओढत नेले त्या ठिकाणी तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. व अत्याचार करून न थांबता घडलेला प्रकार हा कोणाला सांगितल्यास तुला तुझ्या भावाला आणि वडिलांना मारून टाकीन असे म्हणत जीवे मारून टाकण्याची धमकी दिली.

# 31.75 लाखांचा धनादेश बाऊन्स; दाम्पत्याला सहा महिन्यांचा कारावास

## 63 लाखांची नुकसानभरपाई देण्याचे न्यायालयाचे आदेश; 13 वर्षांनंतर लागला निकाल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** जमीन व्यवहार रद्द झाल्यानंतर आगाऊ रकमेच्या परतफेडीसाठी दिलेला ३१ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश अनादरित झाल्याप्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी बी. डी. चोखट यांनी सुधाकरराव गंगाधर उदावंत व सरलादेवी सुधाकरराव उदावंत या दाम्पत्याला दोषी ठरवत सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट म्हणजे ६३ लाख रुपये नुकसानभरपाई म्हणून फिर्यादींना अदा करण्याचे आदेश दिले.

प्रकरणात प्रकाश जगन्नाथ राणा (रा. विजयनगर) व अन्य यांनी अ‍ॅड. राजेश एस. बिहानी आणि अ‍ॅड. प्रदीप एन. पवार यांच्यामार्फत न्यायालयात तक्रार दाखल केली होती. बायजीपुरा येथील सुमारे पाच हजार चौरस फूट जागेचा ५५ लाख रुपयांचा व्यवहार दोन्ही पक्षांत ठरला होता. त्यासाठी फिर्यादींनी उदावंत दाम्पत्याला ३५ लाख रुपये बयाणा दिला. मात्र व्यवहार पूर्ण होऊ शकला नाही. त्यामुळे २७ ऑगस्ट २०१२ रोजी परस्पर संमतीने विक्री करार रद्द करण्यात आला आणि आगाऊ रक्कम परत करण्याचे आरोपींनी मान्य केले.

परतफेडीचा भाग म्हणून आरोपींनी ३१ लाख ७५ हजार रुपयांचा धनादेश दिला. मात्र तो बँकेत जमा केल्यानंतर अनादरित झाला. त्यानंतर कायदेशीर नोटीस देऊनही रक्कम न दिल्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स अ‍ॅक्टच्या कलम १३८ अंतर्गत न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली.

सुनावणीदरम्यान फिर्यादींकडून धनादेश, बँकेचा परतावा मेमो, कायदेशीर नोटीस, टपालाची कागदपत्रे तसेच रद्द करारनामा न्यायालयात सादर करण्यात आला. या पुराव्यांच्या आधारे धनादेश हा कायदेशीर देयकाच्या परतफेडीसाठीच देण्यात आल्याचे न्यायालयाने मान्य केले आणि दोन्ही आरोपींना दोषी ठरविले.

आरोपींचा बचाव का फेटाळला?

धनादेश दबावाखाली घेतल्याचा दावा केला; मात्र त्यासंदर्भात कोणताही ठोस पुरावा सादर केला नाही. संबंधित पोलिस अधिकाऱ्याची साक्षही न्यायालयात घेण्यात आली नाही. रक्कम परत केल्याचा दावा केला; मात्र त्याबाबत पावती, बँक व्यवहार अथवा अन्य कागदपत्रे सादर करण्यात आली नाहीत.

त्यामुळे आरोपींचा बचाव केवळ तोंडी असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

आरोपींच्या वतीने अ‍ॅड. के. जी. भोसले आणि अ‍ॅड. मिलिंद पाटील यांनी काम पाहिले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार

निर्णय देताना न्यायालयाने रंगप्पा विरुद्ध श्री मोहन, बीरसिंग विरुद्ध मुकेश कुमार, हितेन पी. दलाल विरुद्ध ब्रतिंद्रनाथ बॅनर्जी तसेच के. भास्करन विरुद्ध शंकरन वैद्यन बालन या सर्वोच्च न्यायालयाच्या महत्त्वपूर्ण निर्णयांचा आधार घेतला. या निर्णयांतील तत्त्वांचा विचार करून धनादेश कायदेशीर देयकाच्या परतफेडीसाठी दिला असल्याचे न्यायालयाने ग्राह्य धरले.

१३ वर्षांनंतर लागला निकाल

२०१३ मध्ये धनादेश अनादरित झाल्यानंतर दाखल झालेल्या या खटल्याचा अंतिम निकाल तब्बल १३ वर्षांनी लागला. दीर्घकाळ प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे फिर्यादींना झालेला आर्थिक फटका, व्याजाचा घटक आणि न्यायालयीन विलंब यांचा विचार करून न्यायालयाने सहा महिन्यांच्या कारावासासह धनादेशाच्या दुप्पट म्हणजे ६३ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश दिले.

# अजिंठा घाटात ट्रकमधले डिझेल संपल्याने तब्बल 1 तास ट्रॅफिक जाम; बाजारात जाणारा 'मिरचीचा माल' वाटेतच खोळंबला!

**अजिंठा :** घाटातील प्रवाशांची आणि वाहनधारकांची ससेहोलपट काही थांबण्याचे नाव घेत नाहीये. कधी रस्त्यावरील खड्डे, कधी साचलेले पाणी, तर कधी वाहनचालकांचा अति-निष्काळजीपणा! आज (दि. १९ जुलै २०२६) सायंकाळच्या सुमारास एका ट्रक चालकाच्या भोंगळ कारभारामुळे अजिंठा घाटात तब्बल **१ तास** मोठी वाहतूक कोंडी झाल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या कोंडीत वेळेवर बाजारात पोहोचवावा लागणारा हिरव्या मिरचीचा भरलेला ट्रकही अडकून पडल्याने व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

काय आहे छायाचित्रात आणि घटनेचे वास्तव?

(सायंकाळी ६.११ वा.) घाटातील भीषण वाहतूक कोंडी आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा स्पष्टपणे दिसत आहेत.



**डिझेल संपले आणि घाट जाम:**** मिळालेल्या माहितीनुसार, घाटातून जाणाऱ्या एका अवजड ट्रकचे डिझेल अचानक संपले आणि तो भर रस्त्यातच ऐन घाटात बंद पडला. घाट रस्ता अरुंद आणि नागमोडी असल्यामुळे या एका बंद पडलेल्या ट्रकमागे वाहनांच्या रांगा लागल्या आणि पाहता पाहता संपूर्ण घाट १ तासासाठी 'पॅक' झाला. "घाटात प्रवेश करण्यापूर्वी गाडीत डिझेल आहे की नाही, एवढेही साधे भान चालकाला नसावे का?" असा संतप्त सवाल आता प्रवासी विचारत आहेत.

**मिरचीचा 'टायमिंगचा माल' धोक्यात:** या वाहतूक कोंडीचा सर्वात मोठा फटका शेतमालाला आणि व्यापाऱ्यांना बसला आहे. छायाचित्रात समोरच हिरव्या मिरचीने गच्च भरलेला एक मोठा ट्रक या कोंडीत अडकलेला दिसत आहे. मिरचीसारखा नाशवंत शेतमाल एका विशिष्ट वेळेत (टायमिंगवर) बाजार समितीत पोहोचावा लागतो. जर तो वेळेवर पोहोचला नाही, तर मालाचा लिलाव बुडतो, भाव पडतात आणि लाखो रुपयांचा फटका बसतो. एका चालकाच्या 'डिझेल संपण्याच्या' निष्काळजीपणामुळे दुसऱ्याचा लाखोंचा माल वाटेतच सडण्याची वेळ आली आहे.

अजिंठा घाटात अशा प्रकारे वाहने बंद पडून ट्रॅफिक जाम होणे ही आता नित्याचीच डोकेदुखी झाली आहे. या रोजच्या 'ट्रॅफिक जाम'च्या जाचातून सामान्य प्रवाशांची आणि वेळेवर माल पोहोचवणाऱ्या वाहनधारकांची सुटका कधी होणार, हाच खरा यक्षप्रश्न आहे!

# वैज्ञानिक तपासणीपूर्वी बीज कंपन्यांवर कारवाई टाळावी : SIAM

## सोयाबीन तक्रारींवर निष्पक्ष व विज्ञानाधारित चौकशीची मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** सीड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (SIAM) ने राज्यातील सोयाबीन पिकाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी गंभीर असल्याचे मान्य करत, शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी असल्याचे म्हटले आहे. मात्र, कोणत्याही तक्रारीची वैज्ञानिक तपासणी पूर्ण होण्यापूर्वीच बीज कंपन्यांविरुद्ध गुन्हे दाखल करणे किंवा दंडात्मक कारवाई करणे हे 'Ease of Doing Business' च्या तत्त्वांना बाधा देणारे असल्याची भूमिका संघटनेने मांडली आहे.

SIAM च्या प्रसिद्धीपत्रकानुसार, बियाण्याची उगवण आणि पिकाची वाढ ही केवळ बियाण्याच्या गुणवत्तेवर अवलंबून नसून पाऊस, जमिनीतील ओलावा, पेरणीची वेळ, मातीचा प्रकार, हवामान तसेच शेतातील व्यवस्थापन यांसारख्या अनेक घटकांवर अवलंबून असते. त्यामुळे कोणत्याही निष्कर्षापूर्वी तज्ज्ञ समितीमार्फत सखोल व वैज्ञानिक तपासणी होणे आवश्यक असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.

भारत सरकारने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'Ease of Doing Business', उद्योगस्नेही वातावरण, संशोधनाला प्रोत्साहन आणि पारदर्शक प्रशासनाला प्राधान्य दिले आहे. बीज उद्योग हा संशोधनाधारित उद्योग असून नवीन वाण विकसित करण्यासाठी अनेक वर्षांचे संशोधन, मोठी गुंतवणूक आणि कठोर नियामक प्रक्रिया आवश्यक असते. वैज्ञानिक निष्कर्षांशिवाय होणारी कठोर कारवाई उद्योगातील गुंतवणूक, संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासावर विपरीत परिणाम करू शकते. तसेच ही भूमिका Seeds Act च्या भावनेलाही बाधा पोहोचवणारी ठरू शकते, असे SIAM ने नमूद केले आहे. संघटनेने महाराष्ट्र शासनाकडे प्रत्येक तक्रारीची स्वतंत्र, निष्पक्ष व विज्ञानाधारित तपासणी करण्याची, हवामान व इतर कृषी घटकांचा सखोल विचार करण्याची, वैज्ञानिक निष्कर्ष येण्यापूर्वी फौजदारी कारवाई टाळण्याची तसेच शेतकरी, कृषी विद्यापीठे, कृषी तज्ज्ञ आणि बीज उद्योग यांच्या समन्वयातून वस्तुनिष्ठ निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

# सेलू–जिंतूर समृद्धी महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला अखेर निर्णायक यश

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** मागील चार वर्षांपासून प्रलंबित असलेल्या सेलू–जिंतूर समृद्धी महामार्गाच्या भूसंपादन प्रक्रियेला जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या कणखर नेतृत्वाखाली अखेर निर्णायक यश मिळाले आहे. आज अखेर सुमारे ९३ टक्के जमीन शासनाच्या ताब्यात आली असून, यामुळे प्रकल्पाच्या पुढील टप्प्याला मोठी गती मिळाली आहे. ९० टक्क्यांपेक्षा अधिक जमीन ताब्यात आल्यामुळे येत्या काही दिवसांत प्रत्यक्ष बांधकामालाही प्रारंभ होण्याची अपेक्षा आहे.

2025 ऑगस्ट ते ऑक्टोबर मध्ये सेलू उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर तब्बल ६७ दिवसांचे उपोषण झाले. तसेच या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयात २२ रिट याचिका दाखल करण्यात आल्या. त्यापैकी १५ ऑक्टोबर २०२५ रोजी स्थगिती (Stay) देण्यात आली होती.

त्यानंतर जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी स्वतः मुख्यमंत्री कार्यालयातील डॉ. श्रीकर परदेशी सर यांच्याशी समन्वय साधून महाराष्ट्र राज्याचे महाधिवक्ता डॉ. मिलिंद साठे यांना शासनाची बाजू प्रभावीपणे मांडण्याची विनंती केली. त्यानुसार १७ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने २२ पैकी २० रिट याचिका फेटाळून लावत शासनाच्या भूमिकेला दुजोरा दिला.

यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने पुणे रिंग रोड प्रकरणात दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित जमिनींचे पुनर्मूल्यांकन (Revaluation) करण्यात आले. ज्या खातेदारांनी संमती दिली नव्हती अथवा जमिनीचा ताबा दिला नव्हता, त्यांना नियमानुसार एप्रिल महिन्यात ताबा सोडण्याच्या नोटिसा बजावण्यात आल्या. ६० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर संबंधित खातेदारांची भरपाईची रक्कम परभणी जिल्हा न्यायालयात जमा करून कायदेशीर पद्धतीने ताबा घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

# देवगिरी बँकेच्या संचालक प्रशिक्षण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## बँकेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रभावी मार्गदर्शन; बँकिंग, NPA व्यवस्थापन व सामाजिक उत्तरदायित्वावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** देवगिरी नागरी सहकारी बँक लि.च्या संचालक मंडळासाठी आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम रविवारी (दि. १९ जुलै २०२६) उत्साहात पार पडला. या प्रशिक्षण कार्यक्रमात बँकेचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, विभागप्रमुख तसेच वरिष्ठ अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या प्रारंभी बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या प्रगतीत संचालकांची भूमिका, सुशासन आणि जबाबदाऱ्या याविषयी मार्गदर्शन केले.

पहिल्या सत्रात हिंगोली बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा यांनी "बँकेच्या प्रगतीमध्ये संचालकांचा सहभाग" या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. प्रभावी नेतृत्व, निर्णयक्षमता आणि सहकार क्षेत्रातील बदलत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी संचालकांनी सक्रिय भूमिका बजावणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

दुसऱ्या सत्रात बँकिंग तज्ज्ञ जयंत अभ्यंकर यांनी "NPA व्यवस्थापन" या विषयावर मार्गदर्शन करत थकीत कर्ज नियंत्रण, जोखीम व्यवस्थापन आणि आर्थिक शिस्त याविषयी महत्त्वपूर्ण माहिती दिली. त्यानंतर कर्ज, ऑडिट, कम्प्लायन्स आणि ताळेबंद विश्लेषण या विषयांवर तज्ज्ञांनी सविस्तर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात केशव सृष्टी प्रतिष्ठानचे रत्नाकर पाटील यांनी सेवाकार्यातील अनुभव आणि बँकेच्या सेवा प्रकल्पांमधील सहभाग या विषयावर प्रेरणादायी विचार मांडले. सामाजिक बांधिलकी आणि ग्राहकाभिमुख सेवा हीच बँकेच्या यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी नमूद केले.

समारोपप्रसंगी अध्यक्ष किशोर शितोळे यांनी संचालकांनी बँकिंग विषयांचा सातत्याने अभ्यास करून बँकेच्या व्यवस्थापनात सक्रिय सहभाग घ्यावा, नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारावी आणि बँकेसाठी निश्चित वेळ द्यावा, असे आवाहन केले. व्यवसायवृद्धीसोबतच सामाजिक बांधिलकी जपत समाजोपयोगी सेवाकार्यांनाही प्राधान्य देण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या प्रशिक्षणामुळे संचालकांना बँकिंग क्षेत्रातील बदलते नियम, प्रभावी प्रशासन, आर्थिक शिस्त आणि सामाजिक उत्तरदायित्व याविषयी उपयुक्त माहिती मिळाली. उपस्थितांनी अशा प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीला निश्चितच गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण नांदेडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे, रूपेंद्र कोयळकर यांच्यासह बँकेचे संचालक, विभागप्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# नीट-टेट पेपरफुटीविरोधात उरणमध्ये २० जुलै रोजी एल्गार!

## विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणाऱ्या व्यवस्थेविरोधात DYFI-SFI चे तीव्र आंदोलन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण - रायगड :** देशभरात वारंवार होत असलेल्या नीट (NEET) व टेट (TET) परीक्षा पेपरफुटी प्रकरणांमुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी सुरू असलेल्या गंभीर खेळाविरोधात डेमोक्रॅटिक यूथ फेडरेशन ऑफ इंडिया (DYFI) आणि स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI), उरण यांच्या वतीने सोमवार (दि. २० जुलै) सकाळी ११.०० वाजता गांधी चौक, उरण येथे जाहीर आंदोलन करण्यात येणार आहे.

DYFI-SFI ने प्रसिद्ध केलेल्या पत्रकात केंद्र व राज्य सरकारच्या परीक्षा व्यवस्थेवर तीव्र प्रश्नचिन्ह उपस्थित करत, वारंवार होणाऱ्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक नुकसान होत असल्याचा आरोप केला आहे. प्रामाणिकपणे वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले जात असून, दोषींवर कठोर कारवाई करण्यात प्रशासन अपयशी ठरल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

संघटनांनी म्हटले आहे की, परीक्षा व्यवस्थेतील भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि पारदर्शकतेचा अभाव यामुळे विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत झाला आहे. पेपरफुटी ही आता अपवाद नसून व्यवस्थेतील गंभीर अपयशाचे प्रतीक बनली आहे. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांसारख्या दुर्दैवी घटनाही या व्यवस्थेच्या निष्काळजीपणावर प्रश्न उपस्थित करतात, असे पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

आंदोलनाद्वारे संघटनांनी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी, पेपरफुटी प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांमार्फत चौकशी, दोषींना कठोर शिक्षा, एनटीए बरखास्त करणे, प्रभावित विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, टेट परीक्षा पारदर्शक पद्धतीने पुन्हा घेणे आणि परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी मोफत प्रवासाची सुविधा यांसह विविध मागण्या सरकारसमोर मांडल्या आहेत.

DYFI-SFI ने उरण तालुक्यातील विद्यार्थी, पालक, युवक आणि नागरिकांना मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. "पेपरफुटी थांबवा, विद्यार्थ्यांचे भविष्य वाचवा" हा आंदोलनाचा प्रमुख संदेश असून, शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात हा लढा अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

उद्या (२० जुलै) सकाळी ११.०० वाजता गांधी चौक, उरण येथे होणाऱ्या या आंदोलनाकडे विद्यार्थी, पालक आणि संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले असून, प्रशासन या आंदोलनाची कितपत गंभीर दखल घेते, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

# उरणमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती व कठोर कारवाईसाठी सहकार्याची ग्वाही

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**उरण / रायगड :** आज नशामुक्त नवी मुंबई अभियान उरण मध्ये लीड करणारे दर्शन नाईक व प्रतिक अमृते यांनी नवी मुंबई न्हावा शेवा बंदर पोर्ट विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त (ACP) विजय चौधरी यांची सदिच्छा भेट घेतली व उरणचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल त्यांचे स्वागत केले.

एसीपी विजय चौधरी हे सलग तीन वेळा 'महाराष्ट्र केसरी' किताबाचे मानकरी असून आपल्या शिस्तबद्ध, कर्तव्यदक्ष आणि जनहितैषी कार्यपद्धतीसाठी ओळखले जातात. क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय यशानंतर त्यांनी महाराष्ट्र पोलीस दलात अधिकारी म्हणूनही उल्लेखनीय सेवा बजावली आहे.



या भेटीदरम्यान उरण परिसरातील अमली पदार्थांचे व्यसन, ड्रग पेडलिंग तसेच युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाच्या समस्येवर सविस्तर चर्चा करण्यात आली. अमली पदार्थांच्या विक्री व वितरणाविरोधात 'झिरो टॉलरन्स' धोरण प्रभावीपणे राबविण्यासाठी पोलीस प्रशासन व सामाजिक संस्थांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली.

# जात पडताळणी समितीला टाळे ठोकणार, महादेव कोळी समाजाच्या बैठकीत निर्धार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधि

**परभणी:** मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीचे संशोधन न करता मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीच्या बाबतीत असलेले ब्रिटिश कालीन, निजाम कालीन, संदर्भ ग्रंथ, संशोधनपर ग्रंथ,गॅजेट, जनगणना याकडे जाणीवपूर्वक लक्ष करून आणि तत्कालीन कायद्यानुसार झालेल्या केवळ जुन्या कोळी नोंदी शोधून मराठवाड्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीची प्रकरणे अवैध करण्याचा सपाटा जात पडताळणी समितीकडून सुरू असुन सातत्याने होत असलेल्या अन्यायाविरुद्ध या जमातीत प्रचंड रोष निर्माण झाला असून या दोन्ही जमातीच्या वतीने छत्रपती संभाजी नगर येथील अनु जमाती प्रमाणपत्र तपासणी ( क्र.1) समितीस 10 ऑगस्ट रोजी प्रतिकात्मक टाळेठोक आंदोलन करण्याचा निर्धार परभणी आणि बीड जिल्ह्यातील महादेव कोळी समाज बांधवांच्या बैठकीत करण्यात आला.

अनुसूचित जमाती अंतर्गत क्रमांक 29 वर कोळी महादेव आणि 30 क्रमांकावर कोळी मल्हार या जमाती आहेत.. ह्या दोन्ही जमातीच्या 1950 पूर्वी ब्रिटिश काळात पुर्ण महाराष्ट्रात कोळी नोंदी झालेल्या आहेत. पुणे, ठाणे, नगर, नाशिक, रायगड जिल्ह्यातील महादेव कोळी, मल्हार कोळी बांधवांना कोळी नोंदीवरून वैधता प्रमाणपत्र दिले जाते. तेथे कोळी नोंद चुकीची ठरवली जात नाही. मात्र महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीचे पारंपरिक



मूळ वस्तीस्थान असलेल्या मराठवाडा बालाघाटातील महादेव कोळी, मल्हार कोळी जमातीच्या बांधवांची प्रकरणे मात्र कोळी नोंदीवरून प्रकरण अवैद्य केले जाते त्यामुळे या जमातीत प्रचंड रोष निर्माण झाला आहे.एकाच आदिवासी विकास विभागाच्या असणाऱ्या जात पडताळणी समितीकडून पुणे, ठाणे, नगर, नाशिक, रायगड जिल्ह्याला एक न्याय आणि मराठवाड्याला वेगळा न्याय का? असा प्रश्न उपस्थित करीत समितीने अवलंबलेल्या भेदभावाच्या निषेधार्थ समितीस टाळे ठोकण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

मे महिन्यात मराठवाड्यातील महादेव कोळी मल्हार कोळी जमातीच्या बांधवांनी 14 दिवस अन्नत्याग उपोषण केल्यानंतरही प्रश्न जैसे थे आहे. उपोषणाच्या स्थगिती वेळी समितीस 60 दिवसाचा कालावधी पडताळणी समितीस देऊन टाळे ठोक करण्याचे निवेदन त्यावेळेस दिले होते 60 दिवसापेक्षा कालावधी जास्त उलटल्याने 10 ऑगस्ट रोजी मराठवाड्यातील महादेव कोळी मल्हार कोळी समाज बांधवांच्या वतीने समितीस टाळे ठोकण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन या बैठकीत करण्यात आले आहे.

ह्या बैठकीलागणेश राव सूर्यवंशी, अच्युतराव सोगे, किशोर भाऊ सूर्यवंशी, रोहिदास एम्बलवाड, शंकर गंगाधरे, विश्वंभर मेकेवाड,गोविंद सोलेवाड, विठ्ठल बुधवारे, बंडू सौंदडे,राम चिंचलवाड,तुकाराम सोळंके नागनाथ पोतलवाड, रामभाऊ वाघमारे,ॲड राजू पिटले, कोंडीबा भंगे, रंगनाथ मामीलवाड यांच्यासह महादेव कोळी जमातीचे कार्यकर्ते उपस्थित होते..

# पिशोर–कोळंबी–भारंबा तांडा मार्गाची चाळण; नागरिकांचा संताप, अपघाताची भीती

हिंदू प्रकाशवार्ता ।
बापूसाहेब हरणकाळ

**पिशोर | प्रतिनिधी :** पिशोर–कोळंबी–भारंबा तांडा या प्रमुख मार्गाची अक्षरशः चाळण झाली असून जागोजागी पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक, शेतकरी, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास जीवघेणा बनला आहे. रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की, "खड्ड्यांत रस्ता की रस्त्यात खड्डे?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

पिशोर ही परिसरातील प्रमुख बाजारपेठ असल्याने कोळंबी, भारंबा तांडा, पळशी (बु.), जैतखेडा, जैतखेडा तांडा, साळेगाव, माळेगाव, ठोकळ तसेच परिसरातील अनेक गावांतील हजारो नागरिक दररोज या मार्गाचा वापर करतात. शाळा-महाविद्यालयीन विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, रुग्णवाहिका आणि विविध शासकीय-खासगी कामांसाठी ये-जा करणाऱ्या नागरिकांची या रस्त्यावर मोठी वर्दळ असते. मात्र, खोल खड्ड्यांमुळे दररोज अपघाताचा धोका वाढत असून वाहनांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, निवडणुकीच्या तोंडावर खड्डे तात्पुरते बुजवून जनतेची बोळवण केली जाते. मात्र, निवडणूक संपताच





कायमस्वरूपी दुरुस्तीकडे लोकप्रतिनिधी आणि संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे परिसरात तीव्र संतापाची लाट निर्माण झाली आहे.

चार वर्षांनी पूल तयार; पण अप्रोच रस्ता अजूनही अधांतरी

पिशोर येथील लोकसेवा पेट्रोल पंपाजवळ नव्याने उभारण्यात आलेल्या पुलाचे काम चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पूर्ण झाले असले, तरी पुलाला जोडणारा अप्रोच रस्ता अद्याप अपूर्ण आहे. सुमारे ८० मीटरचा अप्रोच रस्ता पूर्ण होणे अपेक्षित असताना तो अद्याप पूर्ण झालेला नाही. शिवाय तयार करण्यात आलेला रस्ता अरुंद असल्याने एकावेळी एकच वाहन जाऊ शकते. त्यामुळे वाहतूक कोंडीसह गंभीर अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

'भविष्यातील गरज लक्षात घेऊन पूल उभारला'

याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रवींद्र जारवाल यांनी सांगितले की, भविष्यातील ५० ते ६० वर्षांचा विचार करून पुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. राज्य मार्गाच्या निकषांनुसार पुलाची व अप्रोच रस्त्याची रुंदी निश्चित करण्यात आली आहे. भारंबा तांडा–कोळंबी रस्त्याच्या मूळ कामास मंजुरी मिळाली असून लवकरच कार्यादेश (वर्क ऑर्डर) दिला जाईल. तसेच संभाजीनगर–पिशोर रस्त्याचे काम एमएसआयडीसीमार्फत होणार असून पुलाचे उर्वरित कामही लवकर पूर्ण केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

दुरुस्तीची मागणी

संभाव्य अपघात टाळण्यासाठी संबंधित प्रशासनाने तातडीने सर्व खड्डे बुजवून संपूर्ण रस्त्याची दर्जेदार दुरुस्ती करावी. तसेच पुलाच्या अप्रोच रस्त्याचे अपूर्ण काम युद्धपातळीवर पूर्ण करून नागरिकांना सुरक्षित व सुरळीत वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी जोरदार मागणी नागरिक, शेतकरी, विद्यार्थी आणि वाहनचालकांनी केली आहे.



खुलताबाद-वेरूळ परिसरात पावसाचे जोरदार पुनर आगमन झाल्याने धुक्याची चादर अन् पावसाच्या जोरदार सरे... खुलताबाद शहरासह काही भागात. व ऐतिहासिक वेरूळ लेणी व परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांच्या विश्रांती नंतर आज पुन्हा एकदा निसर्गाचे रूप अधिकच खुलले असून, पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण .

## घाटी रुग्णालयाची प्रतिमा जपा; विकासकामे रखडवू नका : पालकमंत्री संजय शिरसाट

### सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने कामे पूर्ण करण्याचे आदेश; 14 कोटींच्या प्रलंबित कामांची पाहणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील अग्रगण्य शासकीय रुग्णालय म्हणून ओळख असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी)ची प्रतिमा विकासकामांमुळे मलीन होणार नाही, याची काळजी घ्या. दोन-तीन वर्षे कामे प्रलंबित ठेवण्याची प्रवृत्ती थांबवा आणि रुग्णहित लक्षात घेऊन सर्व कामे तातडीने पूर्ण करा, अशा कडक सूचना सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या



अधिकाऱ्यांना दिल्या.

रविवारी पालकमंत्री शिरसाट यांनी घाटी रुग्णालयातील प्रलंबित विकासकामांची पाहणी केली. तत्कालीन अधिष्ठाता डॉ. संजय राठोड यांच्या कार्यकाळात मंजूर झालेल्या १४ कोटी रुपयांच्या निधीतून सर्जिकल इमारतीत सुरू असलेली कामे अद्याप पूर्ण झालेली नसल्याची दखल घेत त्यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांना ती तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांनी घाटी रुग्णालयातील रुग्णसेवा, सुरू असलेली विकासकामे तसेच जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) आणि शासनाच्या सहकार्यामुळे रुग्णसेवा अधिक सक्षमपणे सुरू असल्याची माहिती दिली.

यावेळी बोलताना पालकमंत्री शिरसाट म्हणाले की, घाटी रुग्णालयात मराठवाड्यासह सुमारे १६ जिल्ह्यांतील रुग्ण उपचारासाठी येतात. येथे डॉक्टर, परिचारिका आणि कर्मचारी चोवीस तास रुग्णसेवेसाठी कार्यरत असतात. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने घाटीतील विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य देऊन ती वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे.

अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांच्या विनंतीनुसार पालकमंत्री शिरसाट यांनी संबंधित अधिकारी आणि ठेकेदारांसह कामांची प्रत्यक्ष पाहणी केली. येत्या जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत १४ कोटी रुपयांच्या विकासकामांचा आढावा घेतला जाणार असून, कामात दिरंगाई झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी ठेकेदाराला दिला.

यावेळी अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण, अधीक्षक अभियंता एस. एस.

## आचार्य श्री विनम्रसागर महाराज ससंघांचे छत्रपती संभाजीनगरात भव्य मंगल आगमन

### चातुर्मासासाठी हजारो भाविकांची उपस्थिती; चार महिन्यांच्या धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** परमपूज्य समाधिस्थ आचार्य श्री विरागसागर महाराज यांचे परम प्रभावक शिष्य, आचार्य श्री १०८ विनम्रसागर महाराज ससंघ (१९ साधू व आर्यिका माताजी) यांचे चातुर्मासासाठी रविवारी छत्रपती संभाजीनगर येथे भव्य मंगल आगमन झाले. राजाबाजार येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात सकल दिगंबर जैन समाजाच्या वतीने त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत करण्यात आले.




सकाळी ७.३० वाजता युगप्रवर्तक आदिनाथ दिगंबर जैन मंदिर, अरिहंत नगर येथून धर्मध्वज, नवकार महामंत्राचा जयघोष, भजन-कीर्तनाच्या वातावरणात भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. बालाजी नगर, मोंढा नाका, लक्ष्मण चौक, अभिनय थिएटर, किराणा चावडी मार्गे ही शोभायात्रा राजाबाजार येथील श्री पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात दाखल झाली. मार्गभर विविध सामाजिक व धार्मिक संस्थांनी तसेच समाजबांधवांनी पुष्पवृष्टी, मंगल आरती व जयघोष करून आचार्य श्रींचे स्वागत केले. महिला, पुरुष, युवक-युवती आणि बालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यावेळी आचार्य श्री विनम्रसागर महाराज यांनी प्रवचनात सांगितले, "चांगले कार्य उद्यावर ढकलू नका. वेळ अमूल्य असून त्याचा सदुपयोग धर्म, आराधना आणि सेवेसाठी करा." त्यांनी छत्रपती संभाजीनगरातील समाजाच्या गुरु भक्ती, समर्पण आणि संघटनभावनेचे विशेष कौतुक केले. विनम्र चातुर्मास–२०२६ संयोजन समितीने सांगितले की, पुढील चार महिन्यांत आचार्य श्रींच्या सान्निध्यात प्रवचने, स्वाध्याय, तप, आराधना, संस्कार शिबिरे व विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. अनेक वर्षांनंतर शहराला आचार्य ससंघांचा चातुर्मास लाभल्याने समाजात आनंद, उत्साह आणि आध्यात्मिक जागृतीचे वातावरण निर्माण झाले असून, चातुर्मासातील सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजन समितीने केले.

## देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताहांतर्गत टर्फ क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ

### मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उद्घाटन; अनिलभैय्या मकरिये यांचा पुढाकार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत भारतीय जनता पार्टी, छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या टर्फ क्रिकेट स्पर्धेचा शुभारंभ रविवारी राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या हस्ते उत्साहात झाला.




सी.बी.एस. रोडवरील हॉटेल देवप्रिया यांच्या मागे असलेल्या मैदानावर आयोजित या स्पर्धेचे आयोजन महानगरपालिकेचे स्थायी समितीचे सभापती अनिलभैय्या मकरिये यांच्या पुढाकारातून करण्यात आले आहे. सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सुरू असलेल्या या स्पर्धेत भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच क्रिकेटप्रेमी युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी क्रीडा स्पर्धांमुळे युवकांमध्ये संघभावना, शिस्त आणि निरोगी स्पर्धेची भावना विकसित होते, असे सांगितले. 'देवाभाऊ कृतज्ञता सेवा सप्ताह' अंतर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

## पोलीस अधीक्षक कार्यालयातील दुचाकी स्वारांना हेल्मेट शिवाय प्रवेश नाही

### विना हेल्मेट आढळल्यास त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होणार

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी:** जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना. विना हेल्मेट आणि पोलीस अधिकारी व त्यांच्यावर मोटार वाहन अधिनियम कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व आमदार यांना दुचाकी वाहने चालवताना सक्तीचे हेल्मेट निर्देश देण्यात आले आहेत व हेल्मेट घातल्याशिवाय पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रवेशच मिळणार नाही या विषयी 18 जुलै शनिवारी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक दीपक दंतुलवार यांच्या स्वाक्षरीने आदेश काढण्यात आला आहे.



पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना दुचाकी वाहन चालवताना हेल्मेट वापरण्याच्या अनुषंगाने निर्देश देण्यात आले आहेत. यांची टक्केवारी कमी करण्याबाबत शासन आदेश व सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार पत्रव्यवहार होत आहेत. या नियमाचे पालन सर्वप्रथम कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अंमलदारांनी मोटार वाहन अधिनियमाचे पालन करणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेता पोलिसांनी शक्तीनेच व हेल्मेटमुळे जीवित हानी अथवा गंभीर दुखापत टाळले जाऊ शकते कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या पोलिसांनी हेल्मेट वापर करणे अनिवार्य आहे.

## भव्य रक्तदान शिबिर, 500 वृक्ष लागवड व श्री ओंकारेश्वर देवस्थान कार्यालय उद्घाटन

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी

**परभणी :** महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष मा. आ. श्री. रवींद्रजी चव्हाण यांच्या सूचनेनुसार भारतीय जनता पार्टी, परभणी महानगरच्या वतीने श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान येथे आयोजित भव्य रक्तदान शिबिर, ५०० वृक्ष लागवड, श्री ओंकारेश्वर देवस्थान (श्रीक्षेत्र त्रिधारा) कार्यालय उद्घाटन सोहळा तसेच देवस्थान परिसराची पाहणी हा सामाजिक उपक्रम मोठ्या उत्साहात व जनसहभागातून यशस्वीरित्या



पार पडला.

या कार्यक्रमास पालकमंत्री मा. ना. सौ. मेघनादीदी बोर्डीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते श्री ओंकारेश्वर देवस्थान, श्रीक्षेत्र त्रिधारा कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर श्री ओंकारेश्वर देवाची विधिवत पूजा व महाआरती करण्यात आली. तसेच देवस्थान परिसराची पाहणी करून विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाचे आयोजक श्रीक्षेत्र त्रिधारा देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा परभणी महानगर जिल्हाध्यक्ष श्री शिवाजी भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त, लोकप्रतिनिधी, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमांतर्गत ५०० वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवरांनी स्वतः वृक्षारोपण करून त्यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला. त्याचबरोबर आयोजित भव्य रक्तदान शिबिरात शेकडो रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संरक्षण आणि मानवसेवेचा प्रेरणादायी संदेश समाजापर्यंत पोहोचला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त, भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक तसेच रक्तदाते आणि वृक्षारोपणात सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे आयोजकांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

"रक्तदान हेच श्रेष्ठ दान – वृक्षारोपण हेच भावी पिढीसाठी सर्वोत्तम योगदान." या संदेशाने संपूर्ण कार्यक्रम प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला.

### मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे गुणवंतांचा गौरव, कर्तत्वाचा सन्मान

## ध्येय साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा - डॉ. प्रवीण वक्ते

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी :** जिवनात स्पष्ट ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करा, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते यांनी येथे केले. मराठवाडा युवक विकास मंडळातर्फे डॉ. हेडगेवार रुग्णालयाच्या दामू अण्णा दाते सभागृहात आयोजित गुणवंतांचा गौरव-कर्तत्वाचा सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विभाग कार्यवाह संतोष




पाठक होते. मंडळाचे अध्यक्ष नरहरी शिवपुरे, सचिव अॅड. अरविंद केंद्रे, रत्नाकर कुलकर्णी, प्रा. गजानन सानप, मिलिंद पोहनेरकर, अनिल टाकळकर, मनोज शेवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. वक्ते म्हणाले, प्रत्येकामध्ये एक वेगळे कौशल्य दडलेले असते. सुप्त गुणांना योग्य दिशा दिल्यास निश्चित यश मिळते. आजचा गौरव ही तुमच्या शैक्षणिक गुणवत्तेची पावती असून, भविष्यातही उज्वल यश संपादन कराल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय समारोप संतोष पाठक यांनी अध्यक्षीय समारो केला.

यावेळी दहावी, बारावी परीक्षेत विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांसह विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सन्मान करण्यात आला. सुहास वैद्य, सर्जेराव जिगे, आरती पोहनेरकर, सविता कुलकर्णी, माधुरी अदवंत, अरुणा महारोळकर, योगिता होके पाटील मल्लीनाथ साखरे, वैशाली दामा आदींचा यात समावेश आहे.

प्रस्ताविकात नरहरी शिवपुरे यांनी युवक विकास मंडळाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. योगेश जोशी यांनी वैयक्तिक पद्य गायले. सूत्रसंचालन तृप्ती पालोदकर यांनी, तर आभार नामदेव कराड यांनी मानले. सुरेश मुंडे, रमेश जायभाये, आनंद वाघ, ज्योती देशमुख, डॉ. गोपाळ बल्लोज, गुणवंत विद्यार्थी, पालक व मंडळ परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. मनोहर बन्सवाल, सचिन रुद्रे, रेणुताई भालेराव यांनी परिश्रम घेतले. आरती पोहनेरकर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## श्री सिद्धेश्वर मंदिर विकासासाठी सुनील भोंबे यांची ₹4.21 लाखांची देणगी

### मंदिर समितीतर्फे सत्कार; विकासकामांसाठी भाविकांनी पुढे येण्याचे आवाहन

**जिंतूर प्रतिनिधी :** जिंतूर येथील पुरातन काळातील श्री सिद्धेश्वर मंदिराच्या विकासासाठी सामाजिक बांधिलकी जपत उद्योजक व समाजसेवक सुनील भोंबे पाटील यांनी ₹4 लाख 21 हजारांची देणगी धनादेशाद्वारे मंदिर समितीकडे सुपूर्द केली. या उदात्त योगदानाबद्दल मंदिर समितीतर्फे त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.



यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागोराव जाधव होते. प्रमुख उपस्थितीत अॅड. विजयराव देशमुख, नगराध्यक्ष प्रताप देशमुख, प्राचार्य श्रीधर भोंबे, नगर सेवक गोपाळ रोकडे, डॉ. दुर्गादास कानडकर, दत्तराव गाडेकर व गंगाप्रसाद घुगे, प.स. अध्यक्ष किशोर खिस्ते, यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या उपस्थितीत सुनील भोंबे पाटील यांनी मंदिर विकासासाठीचा धनादेश मंदिर समितीकडे सुपूर्द केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अॅड. विजयराव देशमुख यांनी केले.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911